**मंत्रिमंडळ निर्णय**
**३ मे २०१६**
**( बैठक क्र. ८२ )**

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | महानगरांचा सुनियोजित आणि शिस्तबद्ध विकास<br>**महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अध्यादेशाच्या मसुद्याला मान्यता** | नगरविकास |
| २ | राज्यपालांच्या मान्यतेनंतर होणार अंमलबजावणी<br>**धुळे, नंदूरबारमधील २२ उपसा सिंचन योजनांच्या विशेष दुरूस्तीच्या कामांना प्रशासकीय मंजुरी** | जलसंपदा विभाग |
| ३ | आश्रमशाळा व वसतिगृहांचे बांधकाम आणि देखभाल-दुरूस्ती<br>**स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्ष स्थापन्याचा निर्णय** | आदिवासी विकास |
| ४ | आदिवासी अनुदानित आश्रमशाळांतील कर्मचारी<br>**आकस्मिक वेतनेतर अनुदान पाचव्या वेतन आयोगानुसार करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी** | आदिवासी विकास |
| ५ | **भारतीय वायुदल व मिहान प्रकल्पाच्या जमिनींच्या अदलाबदलीस मान्यता** | सामान्य प्रशासन |
| ६ | **राज्यातील रास्तभाव दुकानांमध्ये पॉइंट ऑफ सेल उपकरण बसविणार** | अन्न, नागरी पुरवठा |

नगरविकास विभाग

महानगरांचा सुनियोजित आणि शिस्तबद्ध विकास

**महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या**
**अध्यादेशाच्या मसुद्याला मंत्रिमंडळाची मान्यता**

महाराष्ट्रातील महानगर प्रदेशांचा सुनियोजित आणि शिस्तबद्ध विकास करण्यासाठी या प्रदेशांच्या विकासाचे एकात्मिक नियोजन व समन्वयन करणे गरजेचे होते. त्यादृष्टीने प्रस्तावित असलेल्या महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अध्यादेशाच्या मसुद्याला आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्रातील महानगर प्रदेशात येणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच परिसरातील गावांचा जलद, सुनियोजित व शिस्तबद्ध विकास करण्याबरोबरच विविध प्रकल्प राबविताना सुसुत्रता राहण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे प्राधिकरण स्थापन करुन त्यास संविधानिक दर्जा देण्याच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या अध्यादेशाच्या मसुद्यास आज मान्यता देण्यात आली. हे प्राधिकरण मुंबई महानगर प्रदेश वगळता उर्वरित राज्यातील विविध महानगर प्रदेश क्षेत्राचे नियोजन व समन्वय करेल. या प्राधिकरणात मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, गृहनिर्माण मंत्री, संबंधित पालकमंत्री, नगरविकास राज्यमंत्री, या क्षेत्रातील महापौर, जिल्हा परिषद, रोटेशन पद्धतीने नगराध्यक्ष, चार विधानसभा सदस्य, विधानपरिषदेचा एक सदस्य आदींसह विविध अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांचा समावेश असेल.

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणास स्वतंत्र कायद्यान्वये दर्जा व अधिकार देण्यासाठी महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिनियमाची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. यासाठी आज या विधेयकाच्या मसुद्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----o-----

जलसंपदा विभाग

राज्यपालांच्या मान्यतेनंतर होणार अंमलबजावणी

## धुळे, नंदूरबारमधील २२ उपसा सिंचन योजनांच्या विशेष दुरूस्तीच्या कामांना प्रशासकीय मंजुरी

तापी नदीवरील धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील पूर्ण झालेल्या प्रकाशा व सारंगखेडा बॅरेजमधील पाण्याच्या वापरासाठी धुळे जिल्ह्यातील आठ व नंदूरबार जिल्ह्यातील १४ अशा एकूण २२ सहकारी उपसा सिंचन योजनांच्या विशेष दुरूस्तीच्या ४१.७८ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यासंदर्भात राज्यपालांना विनंती करण्यात येणार असून त्यानंतरच त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

ईआरएम (एक्स्टेंशन, रीनोवेशन, मॉडर्नायझेशन) अंतर्गत प्रस्तावित कामांना प्रशासकीय मान्यता देताना अर्थसंकल्पीय तरतुदीच्या दोन टक्के मर्यादेतच प्रस्ताव हाती घेण्याचे राज्यपालांचे आदेश आहेत. या आदेशानुसार २२ उपसा सिंचन योजनांच्या विशेष दुरुस्तीसाठी चालू वर्षाच्या ईआरएम अंतर्गत तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या तरतुदीतून केवळ ७.१६ कोटी रूपये मिळू शकतात. त्यामुळे धुळे व नंदूरबार सारख्या आदिवासीबहूल जिल्ह्यामधील कामांना विशेष बाब म्हणून ४१.७८ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयास मान्यता देण्यासंदर्भात राज्यपालांना विनंती करण्यात येणार आहे.

तापी नदीवर २२ राज्यस्तर उपसा सिंचन प्रकल्पांची उभारणी १९८० ते १९९६ या काळात करण्यात आली होती. त्यानंतर हे प्रकल्प ४ ते १० वर्षाच्या कालावधीसाठी पूर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित होते. या योजनांच्या वरच्या भागात असलेल्या तापी खोऱ्यात नव्याने प्रकल्प होत गेल्याने नदीपात्रातील पाणी आटत गेले. त्यामुळे पाण्याअभावी या उपसा सिंचन योजना बंद पडल्या. त्यानंतर २००७-०८ मध्ये तापी नदीवर योजनांच्या उद्‌भव असणाऱ्या ठिकाणी प्रकाशा व सारंगखेडा बॅरेजेसची उभारणी झाल्यामुळे शाश्वत पाणीसाठा निर्माण झाला आहे. तापी नदीपात्रालगतच्या भौगोलिक परिस्थितीमुळे पाणी वापरासाठी उपसा सिंचन योजनांशिवाय पर्याय नाही. या उपसा सिंचन योजना बंद पडल्यामुळे बॅरेजेसमधील पाणी विनावापर खाली सोडून द्यावे लागत आहे. या विनावापर पाण्याचा शेतीच्या सिंचनासाठी उपयोग करण्यासाठी आजचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचा ५९ गावांना लाभ होणार असून ९०.५० दलघमी पाणी सिंचनासाठी वापरात येऊन १४ हजार ४१३ हेक्टर सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होणार आहे. या योजनांच्या विशेष दुरूस्तीची कामे तापी पाटबंधारे विकास महामंडळामार्फत पूर्ण करण्यात येणार आहेत. या कामांवर होणारा खर्च स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी घटकनिहाय मंजूर तरतुदीच्या मर्यादेत राहील याची जबाबदारी महामंडळावर राहणार आहे. उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रात बारमाही पिकांना सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर बंधनकारक करण्यात येणार असून संस्थेवरील दायित्व संपेपर्यंत या योजनेखाली येणाऱ्या जमिनीचे क्षेत्र अकृषिक करता येणार नाही.

-----o-----

आश्रमशाळा व वसतिगृहांचे बांधकाम आणि देखभाल-दुरूस्ती

**स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्ष स्थापन्याचा निर्णय**

शासकीय आश्रमशाळा व वसतिगृह यांच्या बांधकाम आणि देखभाल-दुरूस्तीसाठी आदिवासी विभागांतर्गत स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शासकीय आश्रमशाळा तसेच वसतिगृहाची बांधकामे व देखभाल-दुरूस्तीची कामे करण्यात येतात. परंतु बांधकामाची प्राकलने (Estimates) तयार करणे, तांत्रिक मान्यता देणे, बांधकाम सूरू करण्याचे आदेश (work order) देणे, निविदा मागविणे व प्रत्यक्ष बांधकाम करणे इत्यादी कामांस सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बराच विलंब होत होता. पर्यायाने बांधकामाच्या खर्चात वाढ होत होती. बांधकामे पूर्ण न झाल्यामुळे शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांअभावी जुन्या इमारतीत किंवा भाड्याच्या इमारतीत रहावे लागते. या सर्वांचा विचार करून स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या कक्षासाठी एक मुख्य अभियंता, दोन अधीक्षक अभियंता यांच्यासह २१ पदांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या ११३.९० लाख रुपयांच्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली. या कक्षाचे मुख्य अभियंता हे आदिवासी विकास विभागाच्या सचिवांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली मंत्रालय स्तरावर काम करतील. तसेच दोन अधीक्षक अभियंत्यांपैकी एक नाशिक येथे व दुसरे नागपूर येथे कार्यरत राहतील. नाशिक येथील अधीक्षक अभियंता यांच्या कार्यक्षेत्रात नाशिक, पुणे व कोकण या महसूल विभागातील तर नागपूर येथील अधीक्षक अभियंता यांच्या कार्यक्षेत्रात नागपूर, अमरावती व औरंगाबाद या महसूल विभागातील जिल्ह्यांचा समावेश राहील.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय प्रशासकीय यंत्रणेची पुनर्रचना करून आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी चार अपर आयुक्तनिहाय कार्यकारी अभियंत्यांच्या सनियंत्रणाखाली समर्पित स्वरुपात आदिवासी बांधकाम विभाग व उप-विभाग स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. या पुनर्रचनेनंतरची यंत्रणा आदिवासी विकास विभागाने नव्याने निर्माण केलेल्या मुख्य अभियंता यांच्या नियंत्रणाखाली काम करेल.

-----o-----

आदिवासी अनुदानित आश्रमशाळांतील कर्मचारी

**आकस्मिक वेतनेतर अनुदान पाचव्या वेतन आयोगानुसार करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी**

आदिवासी अनुदानित आश्रमशाळांना आगामी (२०१६-१७) शैक्षणिक वर्षापासून आकस्मिक वेतनेतर अनुदान पाचव्या वेतन आयोगानुसार देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. याचा लाभ राज्यातील ६३ प्राथमिक व ४९२ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळांना होणार आहे.

या आकस्मिकता अनुदानातून वसतीगृह विभागासाठी आकस्मिकता खर्च, गणवेश, अंथरुण, पांघरुण, भांडी, पाणी, खेळाचे साहित्य, वैद्यकीय खर्च, वीज बील, नाईट ड्रेस, साबण, केस कटींग, वाहतूक, प्रवास इत्यादी बाबींवर खर्च केला जातो. तसेच शाळा विभागासाठी साधनसामग्री, इमारत दुरुस्ती, लेखन साहित्य, ग्रंथालय पुस्तके व इतर बाबींवर खर्च केला जातो. आदिवासी विकास विभागांतर्गत संस्थांना सद्य:स्थितीत देण्यात येणाऱ्या अनुदानाची रक्कम अत्यल्प असल्याने संस्थेकडून विद्यार्थ्यांना पुरेशा सुविधा देणे शक्य होत नाही. परिणामत: त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षण व राहणीमानावर होतो. त्यामुळे वाढीव अनुदान देण्यासंदर्भात आज निर्णय घेण्यात आला.

प्राथमिक अनुदानित आश्रमशाळांना वेतनेतर अनुदान म्हणून आश्रमशाळा व वसतिगृह विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होणाऱ्या एकूण खर्चाच्या ८ टक्के अथवा झालेला खर्च यापैकी कमी असणारी रक्कम देण्यात येत होती. तसेच माध्यमिक विभागासाठी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होणाऱ्या खर्चाच्या १२ टक्के आणि वसतिगृह कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या ८ टक्के आकस्मिक अनुदान देण्यात येत होते. चौथ्या वेतन आयोगानुसार देण्यात येणारे अनुदान आजच्या निर्णयानुसार पाचव्या वेतन आयोगानुसार देण्यात येणार आहे. या निर्णयानुसार प्रतिवर्षी १३.९१ कोटीच्या वित्तीय भारास मान्यता देण्यात आली. यापूर्वी हे अनुदान ५.८० कोटी रूपये एवढे देण्यात येत होते.

-----०-----

अन्न, नागरी पुरवठा विभाग

**राज्यातील रास्तभाव दुकानांमध्ये**
**पॉइट ऑफ सेल उपकरण बसविणार**

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्णत: संगणकीकरण करण्यात येत असून त्याअंतर्गत रास्त भाव दुकानांमध्ये लाभार्थ्यांची बायोमेट्रिक पद्धतीने ओळख पटवून शिधा वस्तूचे वाटप करण्यासाठी पॉइट ऑफ सेल हे उपकरण स्थापित करण्यास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

सार्वजनिक वितरण व्यवस्था पारदर्शक व गैरव्यवहारमुक्त करण्यासाठी तिचे संपूर्ण संगणकीकरण करण्यास यापूर्वीच मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्याअंतर्गत दोन टप्प्यात कार्यवाही करण्यात येत आहे. त्यात पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय अन्न महामंडळाच्या गोदामापासून राज्य शासनाच्या गोदामापर्यंत सर्व टप्प्याचे संगणकीकरण करण्यात येणार आहे, तर दुसऱ्या टप्प्यात राज्यातील सर्व रास्त भाव दुकानातील व्यवहाराचे संगणकीकृत व्यवस्थापन करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या १०३ कोटी ९९ लाख रूपयांच्या खर्चाच्या प्रस्तावासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात रास्त भाव दुकानात लाभार्थ्यांची आधार क्रमांकाशी संलग्नीत बायोमेट्रिक पद्धतीने ओळख पटवून शिधा वस्तूंचे वाटप करण्यासाठी मोबाईल टर्मिनल तंत्रज्ञानाचा वापर करण्यास मंजुरी देण्यात आली होती. मात्र या प्रकल्पाचा सविस्तर प्रस्ताव तयार करणाऱ्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने मोबाईल टर्मिनल तंत्रज्ञानाऐवजी पॉइट ऑफ सेल हे उपकरण अधिक योग्य असल्याने त्याच्या वापराची शिफारस केली होती. त्यानुसार राज्यातील ५१ हजार ७२५ रास्तभाव दुकानांमध्ये हे उपकरण बसविण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या दोन्ही टप्प्याचे काम पूर्ण झाल्यानंतर केंद्र शासन प्रति क्विंटल ८.५० रूपये या प्रमाणे प्रोत्साहन अनुदान देणार आहे. त्यातून या प्रकल्पाचा खर्च भागविण्यात येणार आहे.

-----o-----

## भारतीय वायुदल व मिहान प्रकल्पाच्या जमिनींच्या अदलाबदलीस मान्यता

राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या नागपूर येथील मिहान प्रकल्पाच्या सोयीसाठी भारतीय वायुदल आणि मिहान प्रकल्पाच्या जमिनींची अदलाबदल करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मिहान प्रकल्पातील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तारीकरणाला या प्रकल्पाच्या लगत असणाऱ्या भारतीय वायुदलाच्या जमिनीमुळे अडचण निर्माण होत होती. यामुळे राज्य शासनाने यापूर्वीच भारतीय वायुदलाची जमीन मिहान प्रकल्पास देण्याची विनंती केंद्र शासनाकडे केली होती. ही विनंती मान्य करुन केंद्रीय मंत्रिमंडळाने भारतीय वायुदलाची जागा मिहान प्रकल्पास देण्याचे मान्य केले होते.

या निर्णयानुसार मिहान प्रकल्पाच्या विस्तारीकरणासाठी वायुदलाच्या ताब्यातील २७८.१५८ हेक्टर जमीन व त्याबदल्यात मिहान प्रकल्पाची ४०० हेक्टर जमीन अदलाबदली करण्याचे तसेच केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या ताब्यातील २.३० हेक्टर जमिनीच्या बदल्यात मिहान प्रकल्पाची २.३० हेक्टर जमीन अदलाबदली करण्याचे आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्य करण्यात आले.

मिहान प्रकल्पाच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेली भारतीय वायुदलाची नागपूर विमानतळाच्या क्षेत्राबाहेरील एकूण २७८.१५८ हेक्टर जमीन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे घेऊन त्याबदल्यात मिहान प्रकल्पाकडे असलेली मौजे शिवणगाव इसासनी आणि कलकुटी येथील एकूण ४०० हेक्टर जमीन भारतीय वायुदलास देण्यात येणार आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाला देण्यात येणारी भारतीय वायुदलाची ही जमीन विमानतळाच्या हद्दीत येणारी असली तरी या जमिनीबाबत भारतीय विमानपत्तन प्राधिकरण व भारतीय वायुदलाच्या दरम्यान मालकीबाबत मतभेद होते. याशिवाय केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या ताब्यातील २.३० हेक्टर जमीन महाराष्ट्र विमान विकास प्राधिकरणाकडे घेऊन त्याबदल्यात मिहान प्रकल्पाच्या ताब्यातील मौजे शिवणगाव येथील जमीन केंद्रीय राखीव पोलीस दलाला देण्यात आली आहे. या निर्णयामुळे मिहान प्रकल्पातील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तारीकरणास गती मिळेल.

-----०-----